प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १२ फेब्रुवारी २०२१**

**सिडकोच्या सानपाडा येथील निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांना प्राप्त झाले विक्रमी दर**
**१९ भूखंडांच्या विक्रीतून सिडकोच्या तिजोरीत ६७५ कोटींची भर**

सिडको महामंडळातर्फे ई-लिलाव व ई-निविदा प्रक्रियेद्वारे खारघर, सानपाडा, कळंबोली व उलवे येथील एकूण २० निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांच्या भाडेपट्ट्यावर विक्री योजनेस निविदाकारांचा उत्तम प्रतिसाद लाभून सदर भूखंडांना विक्रमी दर प्राप्त झाला आहे. यामधील सानपाड्यातील सेक्टर १८ मधील २ भूखंडांना प्रत्येकी रू. २,२१,४६८/- व रू. २,६२,५४८/- असे विक्रमी भाव प्राप्त झाले आहेत. या भूखंडांचे आधारभूत दर अनुक्रमे रू. ७७,४६८/- व रू. ९५,०७४/- असे होते. या भूखंडांसोबतच इतर १७ भूखंडाच्या विक्रीतून सिडकोला अंदाजे रू. ६७५ कोटीचा महसूल प्राप्त झाला आहे.

योजना पुस्तिकेतील वेळापत्रकानुसार संपूर्ण प्रक्रिया पार पडून १२ फेब्रुवारी २०२१ रोजी ऑनलाईन माध्यमातून ई-निविदा उघडण्यात आल्या व ई-लिलाव प्रक्रियेमधील बोलींची तुलना करण्यात येऊन यशस्वी निविदादारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत.

सदर योजनांतर्गत सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील खारघर येथील सेक्टर २७ येथे एकूण ९ भूखंड, कळंबोली सेक्टर १७ येथे ४ भूखंड, सानपाडा सेक्टर ८ मध्ये ३ तर सेक्टर १८ मध्ये २ भूखंड व उलवे येथे सेक्टर १९ मध्ये १ भूखंड असे एकूण १९ भूखंड भाडेपट्ट्यावर विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले होते. सदर भूखंड हे निवासी/वाणिज्यिक वापराकरिता उपलब्ध होते.

ई-लिलाव व ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत अर्ज नोंदणी, अनामत रकमेचा भरणा, निविदा भरणे या सर्व प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व जलद अशा ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आल्या. यामध्ये ऑनलाईन माध्यमातून बंद निविदा सादर केल्यानंतर अर्जदरांना पुढील टप्प्यातील ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार होते.

बंद निविदेमध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली किंवा ई-लिलावामध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली यांपैकी जी बोली जास्त रकमेची असेल ती बोली स्वीकारण्याचा निकष निश्चित करण्यात आला होता.

**“सिडकोतर्फे सादर करण्यात येत असलेल्या या योजनांना अभूतपूर्व मिळणारा प्रतिसाद हा सिडकोवर असणाऱ्या सर्वसामान्यांच्या विश्वासाचे प्रतिक आहे, असे मत सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी व्यक्त केले आहे.”**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**